सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

### श्री भगवान विष्णू व महादेव मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा उत्साहात



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. १७ मे : येथील श्री भगवान विष्णू मंदिरांचा जीर्णोद्धार सर्व गावकरी मंडळीच्या सहकार्याने पूर्ण झाला आहे.या मंदिरात भगवान विष्णू व महादेव देवाची मूर्ती स्थापना सोहळा दिनांक १४ रोजी पार पडला .यावेळी मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते. येथील गावकरी यांच्या सहकार्यातून श्री भगवान विष्णू मंदिर उभारण्यात आले आहे.

बुधवारी वास्तुशांती,धान्यनिवास, प्रधान संकल्प, पुण्यहवन, मातृपूजन, देवता स्थापन ,आदी पूजन सोहळा पार पडला तर सायंकाळी गावातून विष्णू देवाची मिरवणूक काढण्यात आली यावेळी महिला आपल्या डोक्यावर कलश घेऊन मिरवणुकीत सहभागी झाल्या होत्या तर वारकरी मंडळी सुद्धा मिरवणुकीत सहभागी झाले होते .गुरुवारी संकल्प, गणपती पूजन, नवग्रह पूजन,रुद्राभिषेक सोहळा पार पडला. श्री भगवान विष्णू व महादेव मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी हभप महंत उत्तम महाराज व हभप विजयानंद महाराज सुपेकर यांच्या हस्ते मूर्ती स्थापना व कलशारोहण सोहळा पार पडला.गुरुवारी सकाळी ११ हभप किशन महाराज परचंडेकर यांचे काल्याचे कीर्तन झाले त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी गावातील नागरिकांनी परिश्रम घेतले..

### भाजपा शहराध्यक्ष पदी रोकडोबा भुसाळे यांची निवड



तभा वृत्तसेवा

किनगाव दि. १७ मे : येथील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते रोकडोबा शिवराज भुसाळे यांनी आज पर्यंत भाजपात केलेले पक्षाचे कार्य लक्षात घेऊन त्यांची निवड किनगाव शहर अध्यक्ष पदी करण्यात आली आहे या निवडीचे नियुक्ती पत्र (दि १५ मे ) रोजी देण्यात आले आहे.

नियुक्ती पत्र देताना माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपा जिल्हा सरचिटणीस त्र्यंबक गुट्टे,युवा भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भागवत गुट्टे,किनगाव ग्रामीण मंडळ अध्यक्ष चंद्रप्रकाश हंगे यांच्या हस्ते भाजपा शहराध्यक्ष पदी नियुक्ती पत्र रोकडोबा भुसाळे यांना देण्यात आले.यावेळी भाजपा नेते त्र्यंबक गुट्टे यांना वाढदिवसा निमित्त सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी उपसरपंच विठ्ठलराव बोडके,धम्मानंद कांबळे,दिनकर मुंडे,श्रीधर फड, प्रा जितेंद्र बदने ,गोविंद चाटे,रतन सौदागर,राम चव्हाण,ग्रामपंचायत सदस्य धनराज बोडके,माऊली दहिफळे, दत्तात्रय कातकडे, इंद्रजीत गुट्टे,आदी जण उपस्थित होते.रोकडोबा भुसाळे यांची निवड झाल्या बद्दल परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### रुप चंदनगर आश्रम शाळेत दाहावीच्या गुणवत्तेची परंपरा कायम

तभा वृत्तसेवा

रेणापुर - दि. १७ मे : रूपचंद नगर येथील माध्यमिक आश्रम शाळेचा (दाहावी)एस एस सी बोर्ड परिक्षेचा निकाल लागला असुन यात ५ विद्यार्थी विशेष प्राविण्य १६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २० विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण होवुन दरवर्षीची गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे .

# श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सन्मान

## निवडणुक प्रक्रियेत उत्कृष्ट योगदान

तभा वृत्तसेवा

औसा दि. १७ मे : शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक, प्रशासकीय आणि लोकशाही प्रक्रियेत सक्रिय योगदान देणाऱ्या औसा तालुक्यातील आलमला येथील श्री विश्र्वेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत संस्थांचा लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. लोकसभा व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२५ या निवडणुकांसाठी मतदान केंद्रावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पाडण्यात संस्थेने यशस्वीपणे मोलाची भूमिका बजावली.याची पोहंचपावती शासन, प्रशासनाने विशेष सत्कार करुन दिली आहे.

निवडणूक प्रशिक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा, प्रशस्त सभागृह, तांत्रिक साधने, बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा तसेच इतर सर्व मूलभूत बाबी संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यामुळे निवडणूक विभागाचे प्रशिक्षण नियोजनबद्ध, सुरळीत आणि यशस्वीरित्या पूर्ण झाले. संस्थेच्या या उल्लेखनीय सहकार्याची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संस्थेला यावेळी सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, सहसचिव महादेव खिचडे, शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्र्वेश्र्वर धाराशिवे, विश्र्वेश्र्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कॉलेजचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे तसेच दगडोजीराव देशमुख डी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हा सन्मान लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, औसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार, उपविभागीय दंडाधिकारी अविनाश कोरडे तसेच तहसीलदार घनश्याम अडसूळ यांच्या हस्ते करण्यात आला.



विश्र्वेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळ केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता समाजहिताच्या विविध उपक्रमांत सातत्याने कार्यरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे, गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, करिअर मार्गदर्शन शिबिरे, रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण मोहीम, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण कार्यक्रम, पर्यावरण जनजागृती तसेच आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन अशा विविध सामाजिक उपक्रमांमुळे संस्थेने समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.याची प्रशासनाने कौतुक करीत दखल घेतली आहे.

या मंडळाअंतर्गत कार्यरत शिवलिंगेश्र्वर कॉलेज ऑफ फार्मसी, विश्र्वेश्र्वरय्या इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेकनॉलॉजी आणि दगडोजीराव देशमुख डी फार्मसी महाविद्यालय या शैक्षणिक संस्थांमधून हजारो विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण, तांत्रिक कौशल्य आणि स्पर्धात्मक परीक्षांसाठी मार्गदर्शन देण्याचे काम संस्थेमार्फत प्रभावीपणे केले जात आहे.याचबरोबर

लोकशाही बळकट करण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत दिलेले योगदान आणि समाजाभिमुख कार्यामुळे श्री विश्र्वेश्र्वर शिक्षण प्रसारक मंडळाचा हा सन्मान संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब ठरत आहे. विविध मान्यवरांनी संस्थेच्या या कार्याचे कौतुक करून आगामी काळातही अशाच सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय राहण्याच्या शुभेच्छा दिल्या.

### संत परंपरेने महाराष्ट्राला अध्यात्म, संस्कार आणि मानवतेचा संदेश दिला : आ. संजय बनसोडे



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १७ मे : संत परंपरेने महाराष्ट्राला अध्यात्म, संस्कार आणि मानवतेचा संदेश दिला आहे. ग्रंथराज ज्ञानेश्वरी हे समाजाला योग्य दिशा देणारे अमूल्य आध्यात्मिक ज्ञान आहे.

अखंड हरिनाम सप्ताह आणि पारायण सोहळ्यामुळे समाजात भक्ती, एकोपा आणि सद्भावना वाढीस लागते. तरुण पिढीने संत साहित्याचा अभ्यास करून आपल्या जीवनात चांगले संस्कार रुजवावेत, असे मत माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

उदगीर तालुक्यातील रावणगाव येथे हनुमान मंदिर परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी पारायण सोहळया प्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी उपसभापती रामराव बिरादार, लातूर जि.प.चे बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, जि.प. सदस्य दिलीपकुमार मटके, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, उपसभापती बापुसाहेब भोसले, पं.स. सदस्य प्रकाश बिरादार, रावणगावचे सरपंच ज्ञानेश्र्वर पाटील आदी उपस्थित होते.

सोहळ्या निमित्त हरिनामाच्या गजराने व भक्तीमय वातावरणाने परिसर दुमदुमून गेला होता. विविध धार्मिक कार्यक्रम, कीर्तन, भजन व प्रवचनाच्या माध्यमातून भाविकांना अध्यात्मिक संदेश देण्यात आला.

यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी मंदिरात दर्शन घेऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. या प्रसंगी ग्रामस्थ, वारकरी संप्रदायाचे मान्यवर, मंदिर समिती सदस्य, कार्यकर्ते आणि महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### त्याग, बलिदान व शौर्याचे प्रतीक छत्रपती संभाजी महाराज : डॉ मांजरे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १७ मे : छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सर्वप्रथम छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकताना डॉ.मांजरे यांनी म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याचा गाडा त्यांनी पुढे घेऊन जाण्याचे ऐतिहासिक स्वरुपाचे कार्य केले. म्हणून त्यांना स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून ओळखले जाते. संभाजी राजांनी नऊ वर्षे अथक परिश्रम करून स्वराज्य विस्तार केला. ते स्वराज्य रक्षक, धर्मवीर होते. संस्कृत भाषेचा त्यांचा गाडा अभ्यास होता. बुधभूषण हा ग्रंथ लिहून खूप मोठे विचार संस्कृत भाषेत लोकांपुढे मांडले. पराक्रमी राजा, धर्मरक्षक यशस्वी मोहिमा राबवणारा योद्धा म्हणून संबंध हिन्दुस्थानात त्यांची ओळख निर्माण झाली. असामान्य शौर्य, आदर्श महावीर, समाजकारणी, राजकारणी, अर्थकारणी व धर्मकारणी म्हणून अनेक क्षेत्रात त्यांनी आपले वर्चस्व सिद्ध केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभागप्रमुख डॉ. सुरेश शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन सहसंयोजक डॉ. ज्ञानोबा मुळे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम जयंती समितीच्या वतीने पार पाडण्यात आला.

### अतनूर येथे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा ; डेंग्यू, मलेरियाविषयी जनजागृती!

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १७ मे : प्राथमिक आरोग्य केंद्र अतनूर येथे राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. आज रोजी डेंग्यू या आजाराबद्दल माहिती देण्यात आली. प्रभातफेरी घेऊन नागरिकांना जनजागृती करण्यात आली. गावातील सर्व घरांची डास आळी प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आले. नागरिकांना आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन करण्यात आले.

**डासांचे उत्पत्तीस्थान नष्ट करा**

आरोग्य स्वयंसेवक आरोग्य मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर यांनी सांगितले की, पावसाळ्यात डेंग्यूचा आजार पसरण्याची भीती असते.डेंग्यू, मलेरिया या आजारांसाठी डासांच्या जीवन चक्रामध्ये चार अवस्था असून, यापैकी तीन अवस्था पाण्यातील आहे. या तिन्ही अवस्था सहज नष्ट करता येतात.त्यामुळे डासांची उत्पत्ती रोखता येऊ शकते, असे मार्गदर्शन उपस्थितांनी केले.

तीव्र स्वरूपाचा ताप, अंगदुखी, डोळ्यांच्या खोबणीमध्ये अंगावर पुरळ येणे, नाक, कान, हिरड्यांतून रक्तस्राव होणे आदी लक्षणे असल्यास डेंग्यू असू शकतो.त्यामुळे त्वरित डॉक्टरांशी संपर्क करावा. असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती कोळ्ळे यांनी केले.

यावेळी राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कीटकनाशक विशेषतः डासांमार्फत प्रसारित होणाऱ्या हत्तीरोग, डेंग्यू, चिकनगुनिया, मलेरिया अशा रोगांच्या नियंत्रणासाठी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र अतनूर अंतर्गत ३२ गाव, वाडी, तांडा वस्तीतील तसेच ५ उपकेंद्राच्या आरोग्य विभागाच्या वतीने राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. यावेळी मलेरियाविषयी जनजागृती करण्यात आली. या मोहिमेत आरोग्यविषयक हस्तपत्रिकेचे वाटप करण्यात आले. आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळणे, पाणीसाठे घट्ट झाकून ठेवावे आदी माहिती गावकऱ्यांना देण्यात आली. गावात मलेरिया व डेंग्यू या आजाराबाबत जनजागरण मोहीम, डेंग्यू जनजागरण मोहीम हाती घेण्यात आली. यामध्ये गृहभेटी देऊन, कंटेनर सर्वेक्षण करून, घरातील सांडपाण्याची भांडी, पिण्याच्या पाण्याचीही व्यवस्थापनाची माहिती दिली. पाणी साठवून टाकी, हौदांची पाहण्यात करण्यात आली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सकलेन शेख, वैद्यकीय अधिकारी डॉ.भक्ती कोळ्ळे, आरोग्य सहाय्यक कर्मचारी सलमान शेख, आरोग्य सहाय्यक बालाजी सोनटक्के, गजानन धोंडोरे, दिपा मांगीलवार, लक्ष्मी मेटे, आरोग्य सहाय्यक चंदा सुळकेकर, महेश बिरादार, आरोग्य सहाय्यक महिला स्मिता म्हात्रे, आशा गटप्रवर्तक ज्योती गायकवाड, आशा कार्यकर्ती विजया बोडेवार, सावित्रा कोकणे, सुरेखा गायकवाड आरोग्य मित्र बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक जनजागरण व मार्गदर्शन संस्थांचे संस्थापक राज्याध्यक्ष बी.जी.शिंदे अतनूरकर, जिजामाता महिला मंडळ अतनूरच्या अध्यक्षा सौ.संध्या बाळासाहेब शिंदे अतनूरकर, वसुंधरा महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.रुक्मीणबाई पांडुरंग सोमवंशी, ग्राहक संरक्षण परिषदेचे शासन नियुक्त अशासकीय सदस्य बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ग्राहक पंचायत महाराष्ट्र राज्य व ग्राहक समिती महाराष्ट्र राज्यांचे प्रदेश संघटक बी.जी. शिंदे, रूग्ण वाहन चालक इस्माईल ताजोद्दीन मुजेवार, परिचारक सुनिल पिंगनवार, परिचारक पृथ्वीराज चव्हाण, आरोग्य कर्मचारी, आणि रुग्णालयातील नातेवाईक व अतनूर प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत २८ गाव, ५ उपकेंद्रातील आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यिका, आरोग्य कर्मचारी प्रतिनिधी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## महापुरुषांना वंदन करत विवाह सोहळा संपन्न

### विवाह सोहळ्यात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १७ मे : निलंगा तालुक्यातील मसलगा येथे शिंदे व कांबळे यांचा विवाह सोहळ्यात प्रथम महापुरुषांना वंदन करत छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करून चि.सौ.कां. पौर्णिमा व चि.निखील यांचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला.

विवाह सोहळाची सुरुवात ही ब्राह्मणांच्या मंत्र उच्चारणे केली जाते परंतु छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती साजरी करत महापुरुषांना वंदन करत एका अनुक्या पद्धतीचा विवाह सोहळा नुकताच संपन्न झाला आहे.

निलंगा तालुक्यातील मसलगा-मुगाव येथील येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयामध्ये १४ मे रोजी कु. पोर्णिमा माधव शिंदे मसलगा ता. निलंगा जि. लातूर व चि.निखिल माधव कांबळे साकोळ ता. शिरूर अनंतपाळ जि. लातूर या नव दांपत्याचा छत्रपती संभाजी महाराज यांची साजरी करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

रूढी परंपरेनुसार देवी देवतांची पूजा करूनच शुभ कार्याला सुरुवात केली जाते परंतु या विवाह सोहळ्यामध्ये शिंदे परिवाराच्या वतीने महापुरुषांना वंदन करत छत्रपती संभाजी महाराज जयंती विवाह सोहळ्यामध्ये साजरी करून अनोख्या पद्धतीने विवाह सोहळा पार पडला. या नवदांपत्यांना शुभ आशीर्वाद देण्यासाठी जिल्हा भरातून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

### बस आगारातील समस्या तात्काळ दूर कराव्यात प्रवासी संघटनेचे प्रादेशिक व्यवस्थाकांकडे साकडे

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १७ मे : तीन राज्याच्या सीमेवर असलेल्या उदगीर बस आगारातील समस्या तात्काळ दूर करण्यासाठी उदगीर तालुका प्रवासी वाहतूक संघटनेच्या वतीने महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक अनघा बारटक्के यांना निवेदन देवून समस्या दूर करण्यासाठी साकडे घालण्यात आले.

उदगीर बस स्थानकाचे गेल्या दहा वर्षांपासून रेंगाळत पडलेले बांधकाम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, उदगीर बस आगाराला कायम स्वरूपी आगार व्यवस्थापक व वाहतूक नियंत्रक देण्यात यावा, उदगीर -लातूर मार्गावर नवीन पाच बसेस वाढवून सायंकाळी सहा ते रात्री नऊ वाजेपर्यंत शटल सेवा सुरू ठेवण्यात यावी,शिवशाही भंगार झालेल्या बसेस तात्काळ आगारात जमा करून ठेवाव्यात,

उदगीर बस स्थानकावर कायम स्वरूपी पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी,उदगीर-देवर्जन-हत्तीबेट मार्गावर दर दीड तासाला बस फेरी सुरू करावी,उदगीर-लातूर विना थांबा बसेसला लातूर व उदगीर बस स्थानकावर तिकीट देण्यासाठी दोन वाहक ठेवण्यात यावेत. या मागणींचे निवेदन संघटनेचे अध्यक्ष श्रीनिवास सोनी व सचिव व्ही. एस. कुलकर्णी यांनी देवून उदगीर बस आगाराच्या समस्या दूर करण्यासाठी साकडे घातले. यावेळी विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पडवळ उपस्थित होते.

### निराधार समितींचे अध्यक्ष सिद्धेश्वर अंकलकोटे, सदस्य रामभाऊ कसबे यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

चाकूर दि. १७ मे : चाकूर तालूका संजय गांधी निराधार योजनेच्या अध्यक्ष पदी सिद्धेश्र्वर अंकलकोटे यांची निवड झाल्याबद्दल यशवंत मंगल कार्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने व पालकमंत्र्यांच्या शिफारशीनुसार निराधार समितीच्या नुकत्याच झालेल्या निवडीत सिद्धेश्र्वर अंकलकोटे अध्यक्ष झाल्याबद्दल यशवंत मंगल कार्यालयाचे संचालक आकाश हिप्पाळे यांनी अध्यक्ष व सदस्य रामभाऊ कसबे यांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी सत्कारला उत्तर देताना नूतन अध्यक्ष म्हणाले की, निराधारांना आधार देण्याचे काम येणाऱ्या काळात आपण करू आणि महाराष्ट्र राज्यांचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी जी माझ्यावर जबाबदारी सोपवली आहे. ती योग्य पद्धतीने पूर्ण करून गोरगरिबांना आधार देण्याचे काम करणार असल्याचे निराधार समितींचे अध्यक्ष सिद्धेश्र्वर अंकलकोटे यांनी सांगितले.

यावेळी जि.प.सदस्य भानुदासराव पोटे, डॉ. सिध्देश्र्वर शेटकर, लातूर रोड येथील मा. सरपंच मधुकरराव मुंडे मा.उपसरपंच अब्दुल शेख बाळासाहेब होनकर, बाबुभाई सह विविध मान्यवर उपस्थित होते.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पाथरूड येथे विविध विकासकामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१७ मे -**

भूम तालुक्यातील पाथरूड गावाच्या सर्वांगीण विकासासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली असून या कामांचा शुभारंभ गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते करण्यात आला.

मंजूर विकासकामांमध्ये युवकांसाठी सुसज्ज व्यायामशाळा, डॉ. बाबासाहेब



आंबेडकर नगर येथे सिमेंट रस्ता व नाली तसेच लहुजी नगर येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजमंदिर आदी कामांचा समावेश आहे.

या विकासकामांमुळे पाथरूडच्या वैभवात भर पडेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी सेवानिवृत्त अधिकारी सुरेश वाळके, शिवसेना ठाकरे उपजिल्हाप्रमुख डॉ. चेतन बोराडे, युवा उद्योजक भाऊसाहेब बोराडे, प्रशांत बोराडे, ग्रामपंचायत सदस्य धोंडीबा टिळक, धनंजय तिकटे यांच्यासह ग्रामस्थ, युवक व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



# जुना राष्ट्रीय महामार्ग सुरु करण्यासाठी नळदुर्गमध्ये रास्तारोको



## महाविकास आघाडीचा इशारा; रस्ता सुरु न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ मे -**

नळदुर्ग शहरातून गेलेला जुना राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आल्याच्या निषेधार्थ महाविकास आघाडीच्या वतीने रविवारी (दि.१७ मे) सकाळी संविधान चौक, नळदुर्ग बसस्थानकासमोर राष्ट्रीय महामार्गावर रास्तारोको आंदोलन करण्यात आले. खंडोबा पणन ते मुर्टापाटी दरम्यानचा जुना महामार्ग तात्काळ सुरू करण्याची मागणी आंदोलकांनी केली.

नळदुर्ग शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग बाह्यवळण रस्त्याकडे वळविण्यात आल्याने शहरातील जुना महामार्ग सध्या बंद आहे. त्यामुळे ऐतिहासिक नळदुर्ग शहरासह स्थानिक व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

यावेळी बोलताना शिवसेना नेते प्रशांत नवगिरे म्हणाले की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाचा हा निर्णय नळदुर्गच्या हिताविरोधात असून शहरातील व्यापार, पर्यटन आणि नागरिकांच्या दैनंदिन हालचालींवर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. जुना राष्ट्रीय महामार्ग तात्काळ सुरू करण्यात यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

जि.प. सदस्य डॉ. जितेंद्र कानडे यांनी सांगितले की, नळदुर्ग हे ऐतिहासिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे शहर असून श्रीखंडोबा मंदिरामुळे भाविकांची मोठी वर्दळ असते. मात्र शहरातून जाणारा जुना महामार्ग बंद केल्याने पर्यटन व व्यापारावर परिणाम झाला आहे.

गोलाई परिसरातील उड्डाणपुलाखालील वळणावर जड वाहनांचे अपघात होत असून बाह्यवळण रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. अणदूर, नळदुर्ग आणि अक्कलकोटला जोडणारा पणनजवळील रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याने जुना महामार्ग सुरू करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तातडीने निर्णय न घेतल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी प्रदीप जोशी, मारुती खारवे, इमाम शेख, संतोष पुदाले यांनीही मार्गदर्शन केले.

रास्तारोको आंदोलनामुळे जळकोट, अणदूर व अक्कलकोटकडे जाणाऱ्या वाहनांची मोठी कोंडी झाली होती. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक ईश्वर नागरे यांना देण्यात आले.

आंदोलनात डॉ. जितेंद्र कानडे, प्रशांत नवगिरे, बाळकृष्ण घोडके पाटील, कृष्णात मोरे, अनिल छत्रे, संतोष पुदाले, सरदारसिंग ठाकूर, मारुती खारवे, इमाम शेख, सुधीर पोतदार, आकाश कुलकर्णी, नसीर इनामदार, फारुख कुरेशी, दिलीप जोशी, राजेंद्र जाधव, दत्ता भोसले, कल्याण करपे, बालाजी गायकवाड, अमित शेंडगे, शाम कनकधर, ओंकार कलशेट्टी, सोमनाथ म्हेत्रे, सज्जाद मौजन, अहमद इनामदार, समीर शेख, साजिद काजी आदींसह महाविकास आघाडीचे पदाधिकारी यांच्यासह कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुचाकींसाठी एमएच २५ बीएल नवीन मालिका

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे दुचाकी वाहनांसाठी लवकरच एमएच २५ बीएल ही नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येणार आहे.

कार्यालयात होणारी गर्दी व नागरिकांचा त्रास टाळण्यासाठी इच्छुक वाहनमालकांनी विहित नमुन्यातील अर्ज दि.१८ मे ते २० मे दरम्यान सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत सादर करावेत. अर्जासोबत पत्त्याच्या पुराव्याची साक्षांकित प्रत तसेच आकर्षक क्रमांकासाठी विहित शुल्काचा डी.डी. जोडणे बंधनकारक राहणार आहे.

एका क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास संबंधित अर्जदारांची यादी २० मे रोजी सायंकाळी ५ वाजता कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर २१ मे रोजी दुपारी १२ वाजता बंद लिफाफ्यात अतिरिक्त डी.डी. स्वीकारून लिलाव प्रक्रिया पार पडणार आहे.

राखीव ठेवलेला क्रमांक ६ महिन्यांच्या आत वाहन नोंदणीसाठी वापरणे आवश्यक असून, अन्यथा तो क्रमांक रद्द होऊन भरलेली फी शासन जमा होणार असल्याचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके यांनी कळविले आहे.

## इंदापुर येथे घरफोडी; सोन्या-चांदीसह रोख रक्कम लंपास



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

तालुक्यातील इंदापुर येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख २१ हजार ३०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे.

याबाबत सतिश कल्याण पारडे (वय ३७, रा. इंदापुर ता. वाशी जि. धाराशिव) यांनी वाशी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, दि.१५ मे २०२६ रोजी रात्री १० ते दि.१६ मे रोजी पहाटे ५ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला.

त्यानंतर घरातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २,२१,३०० रुपयांचा माल चोरून नेला.

या प्रकरणी सतिश पारडे यांनी दिलेल्या प्रथम खबरावरून वाशी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३१ (४), ३०५ (अ) अन्वये अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# मतदार यादी शुद्धीकरणासाठी शिवसेनेचा बूथस्तरावर जोर

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१७ मे -**

मतदार यादी पुनर्निरीक्षण (एसआयआर) अभियानाच्या पार्श्वभूमीवर धाराशिव लोकसभा मतदारसंघातील उमरगा-लोहारा, तुळजापूर व औसा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पक्षाच्या बूथ लेव्हल एजंट (बी.एल.ए.) यांची प्रशिक्षण व संवाद बैठक शनिवारी (दि.१६ मे) उमरगा येथे उत्साहात पार पडली. यावेळी उमरगा व लोहारा तालुक्यातील बी.एल.ए. यांना मान्यवरांच्या हस्ते ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले.

बैठकीत मार्गदर्शन करताना धाराशिव लोकसभा संपर्कप्रमुख उन्मेष पाटील यांनी सांगितले की, राज्यभरात सुरू असलेल्या मतदार यादी पुनर्निरीक्षण (एसआयआर) अभियानामध्ये पारदर्शकता व सुलभता



बी.एल.ए. प्रशिक्षण व संवाद बैठक; कार्यकर्त्यांना ओळखपत्रांचे वितरण

आणण्यासाठी शिवसेनेच्या वतीने बूथनिहाय बी.एल.ए. नेमण्यात आले आहेत.

या अभियानाद्वारे मतदार यादीतील दुबार नावे, मयत व स्थलांतरित मतदारांची नोंद तपासून यादीचे शुद्धीकरण करण्यात येत आहे.

पात्र नागरिकांची नावे मतदार यादीत समाविष्ट व्हावीत आणि कोणताही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. २००२ च्या मतदार यादीशी सध्याची यादी पडताळून पाहण्याच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश कार्यकर्त्यांना देण्यात आले.

आगामी निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी बूथस्तरावर प्रभावीपणे काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी माजी आ. ज्ञानराज चौगुले व जितेंद्र शिंदे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास जि.प. उपाध्यक्षा उषा गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, जिल्हाप्रमुख मोहन पणुरे, लातूर जिल्हाप्रमुख शिवाजीराव माने, उमरगा पंचायत समिती सभापती ॲड. आकांक्षा चौगुले, लोहारा पं.स. सभापती पल्लवी जानकर, अर्चना बिराजदार, उषा जाधव, सोमनाथ स्वामी, तानाजी सुरवसे, ज्ञानेश्वर घोडके, अमोल जाधव, आकाश कांबळे, दत्तोबा भोसले, बळीराम सुरवसे, जगन्नाथ पाटील, संध्या शिंदे, लता भोसले, अमीन सुंबेकर, प्रगती घोटाळे, महानंदा कलबुर्गे, स्नेहा जाधव, स्वाती स्वामी, अश्विनी सोनकांबळे, सुप्रिया घोडके यांच्यासह उमरगा-लोहारा, तुळजापूर व औसा मतदारसंघातील पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### आष्टा येथे स्व-समाधान शिबिरात १५६ दाखल्यांचे वाटप

**भूम, दि.१७ मे -**

महसूल विभागाच्या वतीने तालुक्यातील आष्टा येथे दि.१५ रोजी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित करण्यात आलेले छत्रपती शिवाजी महाराज स्व-समाधान शिबिर उत्साहात पार पडले. शिबिरात जिवंत सातबारा, फेरफार, आयुष्यमान कार्ड आदी योजनांअंतर्गत १५६ दाखले व प्रमाणपत्रांचे जागेवर वाटप करण्यात आले. त्यामुळे लाभार्थी नागरिकांची कार्यालयीन हेलपाट्यांपासून सुटका झाली. शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती सभापती पूजा विशाल ढगे यांच्या हस्ते झाले. यावेळी जि.प. सदस्या साधना अंघारे, सरपंच सुनील जाधव, अरुण काकडे, व्यंकटेश पाटील, तहसीलदार जयवंतराव पाटील, नायब तहसीलदार प्रविण जाधव, मंडळ अधिकारी अनिल महामुनी, तलाठी के.वाय. गायकवाड, चंद्रकांत कसाब, खोत, सुतार, आदिकराव माळी यांच्यासह परिसरातील शेतकरी व लाभार्थी उपस्थित होते.



### तेरणा अध्ययन केंद्राच्या १४ विद्यार्थ्यांना शासकीय सेवेत यश

**धाराशिव, दि.१७ मे -**

डॉ. चंद्रकलादेवी पद्मसिंह पाटील ग्रंथालय व तेरणा स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्राच्या माध्यमातून सन २०२६ मध्ये १४ विद्यार्थ्यांनी विविध शासकीय पदांवर यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. अतुल करवर यांची महसूल सहाय्यकपदी निवड झाली असून, अविनाश वाघमारे, अभिजित ओव्हाळ, रामलिंग निलाखे, कृष्णा कुंभार व शंकर पालखे यांनी पोलीस दलात निवड मिळवली आहे. सन २०१४ पासून सुरू असलेल्या या अध्ययन केंद्रामार्फत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन केले जाते. यावेळी व्यवस्थापक विठ्ठल गायकवाड व सहकारी कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला.



### उमरग्यात जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीला सुरुवात

**उमरगा, दि.१७ मे -**

भारताची जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातील कामाला आजपासून सुरुवात झाली असून या टप्प्यात जनगणना कामावर नियुक्त करण्यात आलेले प्रगणक प्रत्यक्ष घरगणनेच्या पूर्वतयारीच्या कामाला लागले आहेत. या अंतर्गत प्रगणकांना नेमून दिलेल्या भागाला भेट देणे, क्षेत्र निश्चितीकरण करणे, नकाशे तयार करणे तसेच इमारतींना क्रमांक देणे आदी कामे पुढील तीन दिवसांत करण्यात येणार आहेत. उमरगा शहरातही नगरपरिषद कार्यालय परिसरात जनगणनेच्या कामासाठी प्रगणक व पर्यवेक्षकांची लगबग पाहायला मिळाली. शहरातील विविध भागांमध्ये प्रगणक आणि पर्यवेक्षक कार्यरत असल्याचे चित्र दिसून आले. जनगणना प्रक्रिया अचूक व सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासनाकडून आवश्यक सूचना व मार्गदर्शन करण्यात येत आहे. जनगणना कामावर प्रगणक विजय दिडोरे, सुरेश गायकवाड, पूजा राठोड, सागर सन्नी, मोहम्मद शमीम तसेच पर्यवेक्षक सुभाष वैरागकर व जनगणना प्रभारी महेश शिंदे कार्यरत आहेत.



### युवक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांचा भूममध्ये सत्कार

**भूम, दि.१७ मे -**

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आले असता भूम तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे युवा नेते मोईज सय्यद शेखापुरकर, एन.एस.यु.आय.चे धाराशिव जिल्हाध्यक्ष मुशरफ सय्यद, जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष अब्दुल अमीर सलीम, धाराशिव जिल्हा युवा काँग्रेसचे प्रभारी महेश म्हेत्रे, धाराशिव ग्रामीण युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश पवार, श्रीराम हंगेकर, अमित रेड्डी आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

## १५ व्या वित्त आयोगाच्या निधी वाटपावरून जि.प.त वाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

केंद्र शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाकडून जिल्हा परिषदेला प्राप्त झालेल्या निधीच्या वाटपावरून जिल्हा परिषदेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये मतभेद तीव्र झाले आहेत.

शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार व लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप करण्यात यावे, तसेच प्रत्येक मतदारसंघातील अत्यावश्यक कामांना प्राधान्य दिले जावे, अशी मागणी करत शिवसेना (उबाठा) व काँग्रेसच्या सदस्यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. या निवेदनाची प्रत विभागीय आयुक्तांनाही पाठविण्यात आली आहे.

निवेदनात ग्रामीण भागातील गंभीर पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. अनेक पाणीपुरवठा योजना अपूर्ण अवस्थेत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सदस्यांनी नमूद केले.

याशिवाय जिल्ह्यातील बहुतांश प्राथमिक शाळांची अवस्था दयनीय झाली असून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी वर्गखोल्यांची दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या कामांमुळे गावांतर्गत रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून त्यांच्या तातडीच्या दुरुस्तीची गरज असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. निधी वाटपाबाबत अद्यापही साशंकता कायम असल्याने शिवसेना (उबाठा) आणि काँग्रेसच्या सदस्यांनी पुन्हा निवेदन देत आपल्या मतदारसंघातील प्राधान्याच्या कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

या निवेदनावर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या गटनेत्या कांचनमाला संगवे, सुमन विठ्ठल सातपुते, तीर्थराज घाडगे, प्रदीप घोणे, रूपाली नागटिळक, डॉ. जितेंद्र कानडे, अश्विनी जवळगे, प्रतीक्षा सुरवसे आणि महेश देशमुख या महाविकास आघाडीच्या जिल्हा परिषद सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ढोकीत घरफोडी; दागिने व रोख रकमेसह २.७८ लाखांचा ऐवज लंपास

**धाराशिव, दि.१७ मे -**

येथील बालाजी नगर परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण २ लाख ७८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

याप्रकरणी खंडेश्वर बाबासाहेब घोडके (वय ४४, रा. बालाजी नगर, ढोकी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि.१३ मे रोजी सकाळी १० ते दि.१५ मे रोजी रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या घराचे कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला व चोरी केली.

## ग्राम रोजगार सेवकांच्या संपामुळे सिंचन विहिरींची कामे ठप्प

### पर्यायी व्यवस्था करण्याची डॉ. जितेंद्र कानडे यांची बीडीओंकडे मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१७ मे -**

जिल्ह्यात सुरू असलेल्या ग्राम रोजगार सेवकांच्या संपामुळे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या वैयक्तिक सिंचन विहिरींच्या कामांवर मोठा परिणाम होत असून अनेक कामे ठप्प झाली आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद सदस्य डॉ. जितेंद्र गुरुनाथ कानडे यांनी गट विकास अधिकारी यांना शुक्रवारी (दि. १५) निवेदन देत तातडीने पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, ग्राम रोजगार सेवक संपावर गेल्यामुळे 'मस्टर जनरेशन' प्रक्रिया पूर्णपणे बंद पडली आहे. त्यामुळे नवीन मस्टर निघत नसून मजुरांची उपस्थिती नोंदवली जात नाही. परिणामी अनेक सिंचन विहिरींची कामे अर्धवट अवस्थेत थांबली आहेत.

सध्या पावसाळा जवळ आल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. अनेक विहिरींचे खोदकाम पूर्ण झाले असून आता बांधकाम (कर्ब/लाइनिंग) कामे तातडीने करणे आवश्यक आहे. मात्र मस्टर उपलब्ध नसल्याने कामे रखडली असून पावसाळ्यात विहिरी खचण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तसेच शासनाच्या नियमानुसार मजुरांना १५ दिवसांच्या आत काम देणे बंधनकारक असतानाही तांत्रिक अडचणींमुळे मजुरांच्या रोजगारावर परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

डॉ. कानडे यांनी प्रशासनाने तातडीने पर्यायी अधिकारी किंवा तांत्रिक सहाय्यकांकडे मस्टर काढण्याची जबाबदारी सोपवावी, तसेच सुरू असलेली विहिरींची कामे सुरळीत सुरू ठेवण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

हे निवेदन पंचायत समिती, तुळजापूर येथे सादर करण्यात आले असून, यावर गट विकास अधिकारी काय निर्णय घेतात याकडे आता शेतकरी व मजुरांचे लक्ष लागले आहे.

## उदगीर येथे 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' अंतर्गत आयोजन

### भाजपचा जिल्हा प्रशिक्षण वर्ग उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ मे -**

उदगीर येथील शिवम रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आलेला 'पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान' अंतर्गत धाराशिव जिल्ह्याचा जिल्हा प्रशिक्षण वर्ग उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत असून प्रशिक्षण वर्गाचा पहिला दिवस यशस्वीरित्या संपन्न झाला.



भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेचा प्रसार, संघटन मजबुती तसेच कार्यकर्त्यांचे वैचारिक आणि संघटनात्मक प्रशिक्षण या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण वर्गास जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. यावेळी खा. धनंजय महाडिक, आ. राणाजगजितसिंह पाटील, मनोज पांगारकर, पुनीत जोशी, शैलेश गोजमगुंडे तसेच प्रविण साले यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन करत पक्ष संघटन, विचारधारा आणि जनसंपर्काबाबत कार्यकर्त्यांना मोलाचे दिशादर्शन केले. या प्रशिक्षण वर्गासाठी आ. राणाजगजितसिंह पाटील, जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी तसेच मा.आ. सुजितसिंह ठाकूर यांच्या विशेष प्रयत्नांतून कार्यक्रम यशस्वी होत असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, ॲड. अनिल काळे, नेहा काकडे, मनोज पांगारकर, सुनील चव्हाण, सतीश दंडनाईक, साहेबराव घुगे तसेच पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.